# सायबर कॉन्क्लेव्हला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**मुंबई** : व्हाट नउ तर्फे आज प्रतिष्ठित वाय. बी. चव्हाण सभागृहात एक प्रभावी सायबर कॉन्क्लेव्ह यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे नेतृत्व व्हाट नउच्या संस्थापक नीती गोयल आणि सह-संस्थापक अक्षत खेतान यांनी केले. या कॉन्क्लेव्हमध्ये वरिष्ठ धोरणकर्ते, कायदा अंमलबजावणी यंत्रणांचे अधिकारी, कायदेविषयक तज्ज्ञ तसेच युवक प्रतिनिधी सहभागी झाले होते. सायबर जागरूकता, डिजिटल सुरक्षितता आणि उदयोन्मुख सायबर धोके यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या सायबर कॉन्क्लेव्हमध्ये २२ महाविद्यालयांचा सहभाग असून ७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे उपस्थिती लावली. या कार्यक्रमाला राहुल नार्वेकर, अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभेची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी डिजिटल युगात लोकशाही संस्था सुरक्षित ठेवण्यासाठी आणि नागरिकांना सक्षम बनवण्यासाठी सायबर साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच गौरव गौतम, मंत्री युवक व रोजगार, हरियाणा सरकार, हेही या कार्यक्रमास उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी युवकांच्या रोजगारक्षमतेसाठी, उद्योजकतेसाठी आणि राष्ट्रीय प्रगतीसाठी सायबर सुरक्षा कौशल्ये कशी अत्यावश्यक ठरत आहेत यावर प्रकाश टाकला.